आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१० एप्रिल २०२४ - बुधवार

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज नागपूर जिल्ह्यात कन्हान इथं प्रचारसभा होणार आहे. रामटेक लोकसभा मतदार संघातून शिवसेना शिंदे गटाचे राजू पारवे हे महायुतीचे उमेदवार आहेत. नागपूरमधून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी लोकसभा निवडणूक लढवत आहेत. महाआघाडीतर्फे काँग्रेसचे श्यामकुमार बर्वे, रामटेकमधले आणि विकास ठाकरे, नागपूरचे उमेदवार आहेत. वंचित बहुजन आघाडीनं दोन्ही ठिकाणी काँग्रेसच्या उमेदवारांना पाठिंबा दिला आहे. दरम्यान, बहुजन समाज पार्टीच्या अध्यक्ष मायावती उत्तर नागपूरमधल्या इंदोरा इथं उद्या जाहीर सभा घेतील. बसपातर्फे नागपूरमधून योगेश लांजेवार आणि रामटेकमधून संदीप मेश्राम निवडणुकीच्या रिंगणात आहेत. नागपूर आणि रामटेकसह विदर्भातल्या पाच लोकसभा मतदारसंघात येत्या १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवून बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्याबद्दल शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांचे आभार मानले आहेत.

**नागपूर** इथं आज ते वार्ताहरांशी बोलत होते. उपमुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी देखील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे आभार मानले.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज सातारा मतदार संघात शशिकांत शिंदे तर रावेरमधे श्रीराम पाटील यांची उमेदवारी

जाहीर केली. आतापर्यंत पक्षाने एकूण ९ उमेदवारांची नावं जाहीर केली असून, माढ्याचा उमेदवार अजून जाहीर व्हायचा आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात दोन हजार ६४१ नवीन मतदान केंद्र वाढली असून, एकूण केंद्रांची संख्या ९८ हजार ११४ इतकी झाली आहे. मतदारांची नोंदणी सुरु असल्याने या मतदान केंद्रांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. सर्वांत जास्त आठ हजार ३८२ मतदान केंद्रं यावेळी पुण्यात असून, सर्वांत कमी मतदान केंद्र सिंधुदुर्ग आणि गडचिरोलीमध्ये आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर किमान मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून दुर्गम भागातल्या मतदान केंद्रांवर विशेष काळजी घेण्यात येणार आहे.

<><><><><>

आगामी निवडणुकीत दिव्यांग आणि वृद्ध मतदारांना घरुनच मतदान करण्याची सोय निवडणूक आयोगानं उपलब्ध करुन दिली आहे. महाराष्ट्र - तेलंगणा सीमेवरच्या महाराजगुडा इथल्या दिव्यांग महिलेला तसंच नारपठार या गावातल्या तीन वयोवृद्ध नागरिकांनाही ही सुविधा देण्यात आली.

<><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण यवतमाळ - वाशिम लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत

आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><>

राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य मिलिंद मुरली देवरा यांनी आज सदस्यत्वाची शपथ घेतली. नवी दिल्लीच्या संसद भवनात उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देवरा यांच्यासह १० सदस्यांना शपथ दिली.

<><><><>

चैत्र नवरात्राला कालपासून सुरुवात झाली असून त्या पार्श्वभूमीवर देशातल्या सात शक्तिपीठांवर येत्या १७ एप्रिल पर्यंत संगीत नाटक अकादमी तर्फे 'शक्ती- संगीत आणि नृत्य महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्रात कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरात आज आणि उद्या दोन दिवस या महोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

<><><><>

ईद-उल-फित्र, अर्थात रमजान ईदनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. ही ईद सर्वांच्या जीवनात आनंद, उत्तम आरोग्य आणि संपन्नता घेऊन येवो अशी प्रार्थना राज्यपालांनी शुभेच्छा संदेशात व्यक्त केली आहे.

<><><><>

आयपीएल टिट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे. जयपूर इथं संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१० एप्रिल २०२४ - बुधवार

**<><><><><>**

**बुलढाणा** जिल्ह्यात काल वादळी वाऱ्यासह पडलेल्या पावसाने शेती आणि भाजीपाला पिकाचं मोठं नुकसान झालं आहे. चिखली आणि खामगाव तालुक्यात मोठे  वृक्ष उन्मळून पडले असून   पशुधनाची मोठ्या प्रमाणावर हानी झाली. धोडप इथं प्रचंड गारपिटीमुळे संपूर्ण गावावर गारांची चादर पसरली होती.

**हिंगोली** जिल्ह्यात कळमनुरी शहरासह परिसरात काल रात्री झालेल्या वादळी वारा आणि गारपिटीने जटाळवाडी इथल्या एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. कनका इथं गारपिटीच्या तडाख्याने एक गाय अन् चार शेळ्या देखील दगावल्याचं वृत्त आहे. वादळी वारा आणि गारांच्या पावसामुळे पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. सेनगाव तालुक्यात काही ठिकाणी गारांचा पाऊस झाला. वसमत तालुक्यातही अवकाळी पावसामुळे केळी पिकाचं मोठं नुकसान झालं.

हवामान विभागानं आज महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या काही भागांसाठी ऑरेंज अलर्ट दिला असून, मध्य प्रदेश आणि विदर्भात काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**